| | |
|---|---|
| नि.फौ.ख.क्र. ४३७३/२०१६ | |
| सरकार -वि- अंजली व ईतर | |
| निशाणी क्र. ३९ | |

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.६ यांची शपथेवर सरतपासणी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | सत्यवान बाजीराव माने, |
| **वय** | : | ६० वर्षे, |
| **धंदा** | : | सेवानिवृत्त, |
| **राहणार** | : | पिंपरी-चिंचवड |

## सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जयश्री हेडाऊ यांचेमार्फत-

१. दिनांक १९.०३.२०१६ रोजी मी वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून लकडगंज पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्यादिवशी अपराध क्र.३३३०/२०१६ कलम ३, ४, ७, ८ पीटा अधिनियम चा तपास माझ्याकडे सोपविण्यात आला. तपासासाठी माझ्याकडे फिर्याद, छापील प्रथम खबर, घटनास्थळ पंचनामा, आरोपी अंजली काळखोरचा अटक पंचनामा, ईत्यादी कागदपत्र मिळाले. पुढील तपासात मी महिला पोली सरीता पराडकर हिचा जवाब नोंदविला. तपासाअंती अटक आरोपी अंजली व पाहिजे आरोपी शिला काळखोर यांच्याविरुध्द कलम ३, ४, ७ व ८ अनैतीक व्यापार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा निष्पन्न होत असल्याने सदर दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपी शिला काळखोर हिला मी बघीतले नाही.

## उलट तपास आरोपीतर्फे आरोपीचे विद्वान विधीज्ञ अब्दुल अजीम यांचेमार्फत

२. हे म्हणणे खरे आहे की, लकडगंज पोलीस स्टेशनच्या हद्दीत गंगाजमुना परिसर येथे एक पोलीस चौकी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पोलीस चौकीत नेहमी महिला व पुरुष कर्मचारी कार्यरत असतात. हे म्हणणे खरे आहे की, एक महिला अंगप्रदर्शन करीत आहे अशाप्रकारची कोणतीही तक्रार कोणीही सामान्य नागरीकाने सदर पोलीस चौकीत केली नाही.

घटनास्थळापासून कोणतेही धार्मीक स्थळ किती अंतरावर आहे हे बघण्यासाठी कोणीही मोजमाप केले नाही. वादातीत घर कोणाच्या नावाने आहे याबाबत कोणतेही कागदपत्र मी हस्तगत केले नाही. हे मला माहीत नाही की, छापा टाकतांना संबंधीत पोलीस अधिकारी हे सोबत दोन प्रतिष्ठीत व्यक्ती घेऊन गेले होते की नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरीता पराडकर हिचा जवाब तिने सांगितल्याप्रमाणे नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पीटा अधिनियम हे विशेष अधिनियम असल्यामुळे त्यासाठी नियुक्त असलेले विशेष अधिकारी गुन्हयाचा तपास करु शकतो. माझी नियुक्ती विशेष अधिकारी म्हणून करण्यात आली होती हे दाखविण्यासाठी मी कोणतेही कागदपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**
श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2025.12.11 17:59:34 +0530

**( अनामिका दे. बोस )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक ११.१२.२०२५